**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड     **P.S.(ठाणे):** दिंद्रुड

   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0216     **Year (वर्ष):** 2025

   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/08/2025 04:47

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

   1. **Day(दिवस):** गुरूवार     **Date From (दिनांक पासून):** 21/08/2025

      **Time Period (कालावधी):** पहर 6     **Date To ( दिनांक पर्यंत):** 21/08/2025

      **Time From (वेळेपासून):** 16:20 बजे

      **Time To (वेळेपर्यंत):** 18:14 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

   **Date (दिनांक ):** 22/08/2025     **Time (वेळ):** 04:00 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

   **Entry No. (नोंद क्र.):** 001

   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/08/2025 04:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

   पश्चिम, 08 किमी     **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** तेलगाव चौक , तेलगाव ,धारुर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** महादेव आश्रूबा मुंडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1970

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | भगवान नगर,लोणगाव,माजलगाव,दिंद्रुड,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | भगवान नगर,लोणगाव,माजलगाव,दिंद्रुड,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7030275567

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गणेश हरीश्चंद्र आघाव | | | 1. शिवाजी चौक पंचशिल नगर, परळी,दिंद्रुड,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | भागवत रामभाऊ कोके | | | 1. नाकलगाव,माजलगाव,दिंद्रुड, बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 5 नोटा | 2,500.00 |

तेलगाव येथे भेट घेण्यासाठी पायी पाठवुन ते मला माझे कामासंदर्भाने माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? याबाबत लाचमागणी पडताळणी करण्याचे सांगीतले. त्यानुसार मी व पंच क्र.01 मिसे असे तेलगाव उपविभाग, कार्यालयात पायी गेलो असता त्याठिकाणी वायरमन आघाव साहेब व भागवत कोके दिसुन आले नाहीत. त्यानंतर मी त्यांना माझे मोबाईल वरुन कॉल करुन वायरमन आघाव साहेब यांना मी कार्यालयात येवुन थांबलो असल्याचे सांगीतले असता त्यांनी पाच मिनीटात येतो तुम्ही बाहेर येवुन थांबा असे सांगीतले. त्यानंतर मी कार्याल्याचे बाहेर रोडवर येवुन थांबलो असताना वायरमन श्री.आघाव साहेब व श्री.भागवत कोके हे दुचाकीवरुन येवुन त्यांनी मला फोन लावुन रस्त्याचे पलीकडचे बाजुस बोलावुन घेतले व त्यांनी मला त्यांचे दुचाकीवर बसवुन दिंद्रुडकडे जाणा-या रोडने अंदाजे दोन कि.मी. अंतरावर घेवुन जावुन तेथील रस्तालगत असलेल्या एका शेताजवळ थांबवुन त्या शेतात असलेल्या बोअरजवळ नेवुन माझे व वायरमन आघाव साहेब यांचे बोअरजवळ उभा असतानाचे फोटो श्री.भागवत कोके यांनी श्री.आघाव साहेब यांचे मोबाईलमध्ये काढले. त्यानंतर आमच्या मध्ये माझ्या बोअरवेलच्या सर्वे संदर्भाने चर्चा झाली चर्चे दरम्यान सर्वे केलेला अहवाल आजच सबमीट करण्यासाठी श्री.आघाव यांनी मला 3000/- रुपये लाचेची मागणी केली त्यावेळी त्यांचे खाजगी मदतनिस श्री.भागवत कोके यांनी चार पाचशे कमी हयांचा 3 चा पंप आहे असे म्हणाले असता लोकसेवक श्री.आघाव यांनी "अडीच दया..अडीचचं करु मग " असे म्हणुन 2500/- रुपये लाचेची मागणी करुन लाचरक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर वायरमन श्री.आघाव व श्री.भागवत कोके यांनी मला तेलगाव चौकामध्ये सोडले असता मी व पंच क्र.01 मिसे असे आम्ही शासकिय वाहन थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी परत आलोत.

त्यानुसार पोनि/भोळ यांनी मला व दोन्ही पंचांना श्री.आघाव व श्री.भागवत कोके यांचेविरुध्द लागलीच लाचेचा सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/भोळ यांनी वेळे अभावी केलेल्या सर्व कारवाई बाबत एकत्रित पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/भोळ यांनी सापळा कारवाईसाठी अँथ्रॉसीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन पोनि/भोळ यांचे सुचनेवरून पोशि/खरसाडे यांनी प्रात्यक्षिक करुन दाखवुन नियोजित सापळा कारवाईचे अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकास सुचना दिल्या. पोनि/भोळ यांनी माझेकडुन सापळा करवाईसाठी लागणारे 2500/- रुपये ज्यामध्ये 500/-रु दराच्या 05 नोटा घेऊन त्यांचे नंबर व वर्णन पंच क्र.-2 श्री.आनेराव यांचे करवी नमुद करुन घेतले व त्यास अँथ्रॉसीन पावडर लावुन लाचेच्या नोटा माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवल्या. पोनि/भोळ यांनी मला वायरमन श्री.आघाव यांनी लाचेची मागणी केल्यास खिशात ठेवलेल्या लाचेच्या नोटा 2500/-रु. काढुन वायरमन श्री.आघाव यांचे समोर धरुन त्यांनी मागणी केल्यानंतर त्यांना द्याव्यात व सापळा पथकास दर्शनी भागात येवुन " डाव्या हाताने गळया मधील पांढरागमजा काढुन डावे हातात धरावा " असा इशारा नेमुन दिला.

त्यानंतर पोनि/भोळ यांचे सुचनेवरुन पोशि/खरसाडे यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे डावे बाजुस सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे 2500/-रु. लाच रक्कम वायरमन श्री. आघाव यांना देण्यासाठी मी वायरमन श्री.आघाव यांना मोबाईलवर संपर्क केला असता त्यांनी माझा कॉल रिसीव्ह केला नाही त्यानंतर मी श्री.भागवत कोके यांना मोबाईलवर कॉल केला असता त्यांनी मला तेलगाव चौका मध्ये येण्यास सांगीतल्याने मला व पंच क्र.1 मिसे यांना तेलगाव येथील सुरक्षीत ठिकाणावरुन तेलगाव चौकात पायी पाठवुन आमचे पाठोपाठ पोनि/भोळ हे सापळा पथकासह पायी येत होते. मी व पंच क्र.1 श्री.मिसे असे पायी तेलगाव चौक येथे गेलो. त्याठिकाणी राज लक्ष्मी टि कॉर्नर समोर माझी वायरमन श्री.आघाव साहेब व श्री.भागवत कोके यांचेशी भेट झाली. भेट दरम्यान आम्ही तेलगाव चौक येथे कॉफी घेतली त्यानंतर मी वायमन श्री.आघाव साहेब यांना"अडीच हजार आणलेत" असे म्हणुन माझे उजव्या हाताने मी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशात ठेवलेले 2500/- रुपये वायरमन श्री.आघाव साहेब यांचे समोर धरले असता वायरमन श्री.आघाव साहेब यांनी "नाही कसं म्हणावं तुम्हाला तरी" असे म्हणुन त्यांचे डाव्या हाताने लाचरक्कम स्विकारुन त्यांनी परीधान केलेल्या अंगावरील पॅन्टचे डावे बाजुचे पाठीमागील सिटवरील खिशात ठेवले त्यावेळी मी मला लाच स्विकारल्यानंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 18.14 वा. केला.

इशारा प्राप्त होताच पोनि/भोळ, सापळा पथकातील सदस्य व पंच क्र.2 श्री.आणेराव हे तात्काळ घटनास्थळी हजर येवुन वायरमन श्री.आघाव व खाजगी इसम श्री.भागवत कोके यांना तेलगाव चौकात पकडले. पोनि/भोळ यांचे सुचनेवरुन पोशि/खरसाडे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला. तेलगाव चौकामध्ये वाहनांची वर्दळ असल्याने पोनि/भोळ यांचे सुचनेवरुन वायरमन श्री.आघाव व खाजगी इसम श्री.भागवत कोके, पंच व सापळा पथक असे बाजुस अलेल्या मराविविकं.मर्या. चे कार्यालय उपविभाग तेलगाव, येथील कार्यालयात हजर आलोत व तेथे पोनि/भोळ यांनी वायरमन श्री.आघाव व खाजगी इसम श्री.भागवत कोके यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही

पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. त्याठिकाणी पोनि/भोळ यांनी पंच क्र-1 श्री.मिसे यांना विचारणा केली की, मला कोणी लाचेची मागणी केली व माझे कडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.-1 श्री.मिसे यांनी सांगितले की, "वायरमन श्री.आघाव यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन लाच रक्कम 2,500/- रुपये डाव्या हाताने स्विकारुन त्यांनी परिधान केलेल्या पॅन्टचे पाठीमागील डावे बाजुचे खिशात ठेवली." असा खुलासा पंच क्र.1 श्री.मिसे यांनी केला. त्यावेळी वायरमन श्री.आघाव व खाजगी इसम श्री.भागवत कोके हे घाबरलेले होते.

पोनि/भोळ यांनी वायरमन श्री.आघाव व खाजगी इसम श्री.भागवत कोके यांना त्यांचे नाव, पद विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव गणेश हरीश्चंद्र आघाव वय-40 वर्ष, व्यवसाय नोकरी, वरीष्ठ तंत्रज्ञ (वायरमन),नाकलगाव व पिंपळगाव, तेलगाव उपविभाग, मराविविकं मर्या.तेलगाव (वर्ग-3) रा.शिवाजी चौक, पंचशिल नगर, परळी वै. ता. परळी वै. जि.बीड व भागवत रामभाऊ कोके, वय-26 वर्ष, व्यवसाय शेती रा.नाकलगाव ता.माजलगाव जि.बीड असे सांगीतले. पोनि/भोळ यांनी श्री.आघाव वरीष्ठ तंत्रज्ञ यांना लाचरकमे बाबत विचारणा केली असता त्यांनी लाच रक्कम अंगावर परिधान केलेल्या पँन्टचे पाठीमागील डावे बाजुचे खिशात असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि/भोळ यांनी पंच क्र.2 श्री.आणेराव यांना श्री.आघाव यांनी परिधान केलेल्या पँन्टचे पाठीमागील डावे बाजुचे खिशातुन लाच रक्कम बाहेर काढुन ताब्यात घेऊन खात्री करण्यास सांगीतले. त्यावर पंच क्र.2 श्री.आणेराव यांनी लाचरक्कम ताब्यात घेतली व पंच क्र.1 श्री.मिसे यांनी लाचेच्या नोटांचे वर्णन व क्रमांक नमुद असलेला कागदावरील नोटांचे क्रमांक पंच क्र.2 श्री.आणेराव यांना वाचुन दाखवले असता पंच क्र.2 श्री.आणेराव यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे सांगीतले
त्यावेळी पोनि/भोळ यांनी लाच रक्कम 2500/- रुपये पंच क्र.2 श्री.आणेराव यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतले. त्यानंतर पोनि/भोळ यांनी घटनास्थळावरील प्राथमिक कारवाई तेलगाव चौक तेलगाव व तेलगाव उपविभाग, मराविवि कंपनी मर्या. तेलगाव येथे पुर्ण करुन पुढील कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर मी, पोनि/भोळ, सापळा पथकातील सदस्य, दोन्ही पंच, लोकसेवक श्री.आघाव व खाजगी इसम श्री.भागवत कोके असे शासकीय वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे हजर आलोत.

तरी दि.21/08/2025 रोजी 16.20 वा ते 18.14 वा. चे दरम्यान तेलगाव परीसर तेलगाव ता.माजलगाव जि. बीड येथे गणेश हरीश्चंद्र आघाव वय-40 वर्ष, व्यवसाय नोकरी, वरीष्ठ तंत्रज्ञ (वायरमन),नाकलगाव व पिंपळगाव, तेलगाव उपविभाग, मराविविकं मर्या.तेलगाव रा.शिवाजी चौक, पंचशिल नगर, परळी वै. ता.परळी वै. जि.बीड (वर्ग-3) यांनी मौजे नाकलगाव शिवार येथे माझे नावावर असलेल्या गट क्र. 84 मध्ये दिड एकर शेती असुन त्याठिकाणी माझ्या मालकीचा बोअरवेल आहे. त्या बोअरवेलसाठी मागेल त्याला सोलार कृषीपंप योजने अंर्तगत मी 11 जुन 2023 मध्ये ऑनलाईन अर्ज केला होता. त्याचा लाभार्थी क्रमांक MK2305759092 असा आहे. माझा केलेला अर्ज मंजुर झाल्यानंतर मी त्यासाठी शासकिय रक्कम 22971/- रुपये एवढी ऑनलाईन भरलेली आहे. त्यासंदर्भाने सोलारपंप मिळणे साठी शेतात बोअरवेल असल्याचा सर्वे करुन त्याचा अहवाल सबमीट करण्यासाठी 3000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती 2500/- स्विकारण्याचे मान्य करुन तेलगाव चौक तेलगाव येथे लाच रक्कम 2500/-रुपये पंचासमक्ष स्वत: स्विकारली असता श्री.आघाव यांना लाचेच्या रकमेसह पकडले. तसेच श्री.आघाव यांचे खाजगी मदतीनस श्री.भागवत कोके यांनी चार पाचशे कमी करा त्यांचा तिनचा पंप आहे असे म्हणुन श्री.आघाव यांना लाचरक्कम मिळवुन देण्यास प्रोत्साहन दिले म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
हि फिर्याद दिली ती माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन मला वाचुन दाखवली ती बरोबर व खरी आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
MAHADEV Kisanrao DHAKANE(I (Inspector)) / POBN72770 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): MAHADEV Kisanrao
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN72770